नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ११२ Issue - 112 | वार - बुधवार दि. १६ सप्टेंबर २०२६ Blow- Wednesday Date 16 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक नियमांत बदल

## नगरपरिषद, नगरपंचायतींच्या निवडणूक प्रक्रियेत एकवाक्यता आणण्यासाठी अध्यादेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नाम निर्देशनपत्र फेटाळण्यासंदर्भातील अपिलाची तरतूद आणि निवडणूक प्रक्रियेतील नियमांमध्ये एकवाक्यता आणण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५मध्ये सुधारणा करण्यास मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यानुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम (सुधारणा) अध्यादेश, २०२६ काढण्यात येणार आहे.

राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने एखाद्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र फेटाळल्यास त्याविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील करण्याची तरतूद महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, १९६६ मधील नियम १५ आणि १७च्या उपनियम (१) (ब)मध्ये आहे. मात्र, महाराष्ट्र

### नामनिर्देशन फेटाळल्यास अपिलाच्या तरतुदीत बदल

महानगरपालिका अधिनियम, १९४९च्या अनुसूची 'ड'मधील प्रकरण १ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक नियमावली, २००६मध्ये अशा प्रकारच्या अपिलाची तरतूद नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक नियमांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रस्तावित सुधारणेनुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमाच्या कलम २मधील पोटकलम (७)मध्ये असलेल्या 'परिषदेचा सदस्य' या शब्दांऐवजी 'परिषदेचा व पंचायतींचा सदस्य' असा बदल करण्यात येणार आहे. तसेच कलम १७मधील पोटकलम (२), उपखंड (ड)मधील 'आणि नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याविरुद्ध किंवा नाकारण्याविरुद्ध अपिले' हे शब्द वगळण्यात येणार आहेत.

याशिवाय कलम ३४१-बमधील पोटकलम (४)नंतर नवीन पोटकलम (५) समाविष्ट केले जाणार आहे. त्यानुसार नगरपरिषदांमध्ये राज्य निवडणूक आयुक्त, मतदार यादी तयार करणे, मतदानाची पद्धत आणि मतदानावरील इतर निर्बंध यासंबंधी कलम १०अ, ११, १२, १३ आणि १४ मधील तरतुदी योग्य त्या फेरफारांसह नगरपंचायतींनाही लागू होतील. या बदलामुळे नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणूक प्रक्रियेत नियमांची एकवाक्यता आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

पोलिसांच्या ४० हजार घरांच्या प्रकल्पाला मनुष्यबळ

दरम्यान, मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाच्या अध्यक्ष कार्यालयासाठी आणखी चार पदे निर्माण करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. मुंबई पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थाने उभारण्याच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात मुंबईतील ७४ भूखंडांवर ४० हजार निवासस्थाने उभारण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पासाठी सुमारे २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

प्रकल्पाच्या अध्यक्षांच्या कार्यालयासाठी यापूर्वी पाच पदे निर्माण करण्यात आली होती. मात्र, प्रकल्पाचे मोठ्या प्रमाणावरील नियोजन, विविध सरकारी संस्थांमधील समन्वय, आर्थिक व्यवस्थापन आणि कालबद्ध अंमलबजावणी लक्षात घेता अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने चार नवीन पदे निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या चार पदांमध्ये एक उपसचिव, एक अवर सचिव आणि दोन कक्ष अधिकारी यांचा समावेश आहे. या पदांवरील कर्मचाऱ्यांसाठी वार्षिक ६३ लाख ३ हजार १५६ रुपयांचा खर्च अपेक्षित असून, या खर्चालाही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

# स्तनदा मातांसाठी एसटीचा मोठा निर्णय! राज्यभरातील एसटी बसस्थानकांवर उभारणार १२५ 'हिरकणी कक्ष'



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील महिला प्रवाशांसाठी विशेषतः स्तनदा मातांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि खासगी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील एसटी बसस्थानकांवर तीन वर्षांत तब्बल १२५ 'हिरकणी कक्ष' उभारण्यात येणार आहेत. यासाठी एसटी महामंडळ आणि टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक उपस्थित होते.

प्रवासादरम्यान स्तनदा मातांना बाळाची निगा राखण्यासाठी योग्य आणि सुरक्षित जागा मिळावी, हा 'हिरकणी कक्ष' उभारण्यामागील प्रमुख उद्देश आहे. या कक्षांमध्ये मातांना स्तनपान तसेच बाळाची देखभाल करण्यासाठी आवश्यक खासगी आणि स्वच्छ जागा उपलब्ध होणार आहे.

या उपक्रमासाठी टोयोटा किर्लोस्कर मोटर आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधीतून सहकार्य करणार आहे. सामंजस्य करारानुसार एसटी बसस्थानकांवर अंदाजे ३ मीटर ÷ ३ मीटर आकाराचे प्री-फॅब्रिकेटेड कक्ष उभारण्यात येतील. या कक्षांमध्ये आवश्यक फर्निचर, फिक्स्चर, अंतर्गत वायरिंग, विद्युतीकरण आणि इलेक्ट्रॉनिक साहित्य यांचा समावेश असेल. या प्रकल्पाचे काम तीन आर्थिक वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सीएसआर धोरण, उपलब्ध जागा आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन या संख्येत आवश्यकतेनुसार बदल करण्याची तरतूदही सामंजस्य करारात करण्यात आली आहे. प्रकल्पासाठी एसटी महामंडळाकडून अंदाजे ५ मीटर ÷ ५ मीटर जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच वीज, पाणी, स्थापनेसाठी आवश्यक सहकार्य आणि शासकीय परवानग्या मिळवून देण्याची जबाबदारी एसटीची असेल.

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कक्ष आणि त्यातील सुविधा एसटीकडे हस्तांतरित करण्यात येतील. त्यानंतर कक्षांचे संचालन, सुरक्षा, दुरुस्ती, देखभाल आणि देखरेख करण्याची जबाबदारी एसटी महामंडळाची राहणार आहे.


# जरांगेंच्या कायदेशीर मागण्यांबाबत चर्चेसाठी सरकार तयार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सरकार सुरुवातीपासूनच सकारात्मक असून, समाजाला न्याय देताना ओबीसी किंवा अन्य कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, ही सरकारची भूमिका आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्याशी मुख्यमंत्री, मंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि शासनाचे प्रतिनिधी सातत्याने संवाद साधत आहेत. काही विषय न्यायप्रविष्ट असून, ते कायदेशीर व संविधानिक चौकटीत सोडवण्यासाठी सरकार चर्चेसाठी तयार आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी स्पष्ट केले.

मंत्रालयात माध्यमांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय झाला. न्यायालयीन प्रक्रियेनंतर त्याचे प्रमाण १२ आणि १३ टक्क्यांपर्यंत गेले; मात्र पुढे ते सरकार बदलले आणि आरक्षण टिकवता आले नाही. पुन्हा मुख्यमंत्री झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या साक्षीने दिलेला शब्द पूर्ण करत विशेष अधिवेशनात मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्यात आले. आज त्याचा लाभ विद्यार्थी आणि तरुण घेत आहेत.

# सप्टेंबरच्या शेवटच्या दिवसांत महाराष्ट्रात मुसळधार पाऊस पडणार, पंजाबराव डख यांचा अंदाज



मुंबई : महाराष्ट्रात ऑगस्ट महिना आणि सप्टेंबरच्या पहिल्या दोन आठवड्यात अपेक्षित पाऊस पडला नाही. पण १४ सप्टेंबरला राज्यभरात गणेशोत्सवाला सुरुवात झाली. गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला राज्यभरात विविध जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली. त्यामुळे राज्यातील शेतकरी सुखावला आहे. असं असलं तरी राज्यात मुसळधार पाऊस पडताना दिसत नाही. पण आता मुसळधार पावसाची प्रतिक्षादेखील पुढच्या काही दिवसांत संपणार असल्याचा दावा हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी केला आहे. सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसांत राज्यभरात मुसळधार पावसाची शक्यता असल्याचा अंदाज डख यांनी वर्तवला आहे.

१६ सप्टेंबरला विखुरलेल्या स्वरुपाचा पाऊस पडेल. १७ आणि १८ सप्टेंबरला पावसात थोडी वाढ होईल. मुंबई, पुण्यातही या दोन दिवसांत पाऊस पडेल. त्यानंतर १९ ते २४ सप्टेंबरच्या पावसाचे आगमन दक्षिण महाराष्ट्रातून होईल. ज्या भागांमध्ये अद्याप अपेक्षित पाऊस पडलेला नाही तिथे पाऊस पडणार आहे, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली.

१९ ते २४ सप्टेंबर चांगल्या पावसाची शक्यता

राज्यात १७ आणि १८ सप्टेंबरला बऱ्याच भागांमध्ये जोरात पाऊस पडणार आहे. दक्षिण महाराष्ट्र, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात १९ ते २४ सप्टेंबर दरम्यान पाऊस पडणार आहे. सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, पुणे, बारामती, दौंड, मानखटाव, इंदापूर, बीड, आष्टी, जामखेड, कर्जत, धाराशिव, लातूर, बीड, नांदेड, परभणी, जालना या भागांमध्ये १९ ते २४ सप्टेंबर काळात पााऊस पडेल. दक्षिणेकडे बाष्प सक्रिय झाल्यामुळे वातावरण तयार होईल. तिथून हा पाऊस सुरु होऊन राज्यातील इतर भागांकडे जाईल. हा पाऊस विदर्भात आणि उत्तर महाराष्ट्रातही राहील, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली.

२४ सप्टेंबरनंतर विशाखापट्टन येथे समुद्रात एक कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार आहे. त्याचे रुपांतर चक्रीवादळात होणार आहे. त्यामुळे २६ ते ३० सप्टेंबरपर्यंत महाराष्ट्रात पाऊस येणार आहे. हा पाऊस महाराष्ट्रात धुमाकूळ घालणार आहे. सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यातील पाऊस शेतकऱ्यांना तारणारा पाऊस असणार आहे, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे. दरम्यान, राज्य हवामान विभागाकडून पुढच्या चार दिवसांसाठी कोणत्याही जिल्ह्याला पावसाचा रेड, ऑरेंज किंवा यलो अलर्ट जारी करण्यात आलेला नाही. त्यामुळे पुढच्या चार दिवसांत अपेक्षित पावसाची शक्यता कमी आहे. पण पंजाबराव डख यांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढच्या चार ते पाच दिवसांत राज्यात विखुरलेल्या स्वरुपात पाऊस पडेल. हा पाऊस फार कमी वेळासाठी पडेल. पण तो विविध ठिकाणी पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, सध्याची पावसाची परिस्थिती पाहता दुष्काळाला तोंड देण्यासाठी सरकारची तयारी सुरु झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

## मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय; लाडकी बहीण, शेतकरी कर्जमाफीसह २५ योजनांचा समावेश

# सरकारच्या योजना आणि धोरणांचे दर तीन महिन्यांनी होणार मूल्यांकन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सरकारच्या योजना आणि धोरणांचा निधी खर्च झाला म्हणजे त्यांची अंमलबजावणी यशस्वी झाली, असे यापुढे मानले जाणार नाही. योजनांचा प्रत्यक्ष लाभ किती नागरिकांपर्यंत पोहोचला, त्यात अडथळे कुठे आले आणि अंमलबजावणीदरम्यान कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत, याची तिमाही तपासणी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शासनाच्या निर्णय प्रक्रियेत गुणवत्तावाढ करण्यासाठी 'महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष' (महा-टॅक) स्थापन करण्यास मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राज्यातील २५ प्रमुख धोरणांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण आणि २५ प्रमुख लोककल्याणकारी योजनांचे अंमलबजावणीदरम्यानच समांतर मूल्यांकन केले जाणार आहे. सध्या योजनांचा आढावा प्रामुख्याने निधीचा विनियोग आणि भौतिक उद्दिष्टांची पूर्तता या आधारावर घेतला जातो. मात्र, यामुळे योजनेचा प्रत्यक्ष परिणाम स्पष्ट होत नाही. योजना पूर्ण झाल्यानंतर फलनिष्पत्ती तपासण्याऐवजी अंमलबजावणी सुरू असतानाच त्रुटी दूर करण्यासाठी ही नवी व्यवस्था उभारली जाणार आहे.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, मुंबई आणि सेंटर फॉर रिसर्च इन स्कीम्स अँड पॉलिसीज यांच्या संयुक्त प्रस्तावानुसार 'महा-टॅक'ची स्थापना होणार आहे. या कक्षाचे संनियंत्रण मुख्यमंत्री कार्यालयाकडून केले जाईल, तर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन केली जाईल. विविध धोरणांच्या



विश्लेषणासाठी १३ शक्तीप्रदत्त समित्याही स्थापन करण्यात येणार आहेत. धोरणांच्या अंमलबजावणीत संबंधित विभाग, उद्योग, अंमलबजावणी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि लाभार्थी यांच्याशी सल्लामसलत केली जाईल. आवश्यक ठिकाणी सक्षम अंमलबजावणी आराखडा आणि मिशन प्रस्तावित केला जाईल. योजनांचा लाभ योग्य व्यक्तीपर्यंत, पूर्णपणे आणि वेळेत पोहोचतो का, मार्गदर्शक सूचना, शासन निर्णय, निधी प्रवाह आणि खरेदी नियमांचे पालन होते का, याची तपासणी केली जाणार आहे. खर्चाची गुणवत्ता, घटकनिहाय खर्च, अपूर्ण किंवा निरुपयोगी मालमत्ता आणि योजनांची फलनिष्पत्तीही तपासली जाईल.

महा-टॅककडून योजनांमधील परस्पर अभिसरणाच्या संधी शोधल्या जातील. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांशी जोडलेल्या योजनांच्या परिणामांचे स्वतंत्र मोजमाप करण्यात येईल. मुख्यमंत्री कार्यालय आणि संबंधित विभागांना मूल्यांकनावर आधारित तिमाही निर्णय-सहाय्यक अहवाल दिले जाणार असून लाईव्ह डॅशबोर्ड, शिफारशींचा पाठपुरावा आणि कायमस्वरूपी विदा-सामुग्री विकसित केली जाणार आहे.

विश्लेषणासाठी उद्योग, गुंतवणूक व सेवा, जागतिक क्षमता केंद्र, एव्हीजीसी-एक्सआर, रत्ने-आभूषणे, बांबू, लॉजिस्टिक्स, माहिती तंत्रज्ञान, निर्यात, हरित डेटा सेंटर, अवकाश व संरक्षण उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक वाहन, सागरी विकास, स्टार्टअप, कृषी निर्यात, कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता, वस्त्रोद्योग, पर्यटन, गृहनिर्माण, हरित हायड्रोजन यांसह महिला धोरण आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या महाराष्ट्रातील अंमलबजावणी आराखड्याचा समावेश आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०चेही विश्लेषण होणार आहे.

'या' योजनांचा समावेश

समांतर मूल्यांकनासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी, प्रधानमंत्री आवास योजना, मनरेगा, जल जीवन मिशन, आयुष्मान भारत-एमजेपीजेएवाय, पीक विमा, महाडीबीटी शिष्यवृत्ती, अमृत, उमेद, प्रधानमंत्री ग्राम सडक, समग्र शिक्षा, पीएम-पोषण, आयुष्मान आरोग्य मंदिर, पीओसीआरए, पीएम-स्वनिधी, पोषण अभियान, प्रधानमंत्री मातृवंदना, स्वामित्व, पीएम-जनमन, जलयुक्त शिवार २.०, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, क्षयरोग निर्मूलन आणि पोलीस दलाचे आधुनिकीकरण अशा २५ योजनांचा समावेश आहे. या विश्लेषण आणि मूल्यांकनासाठी 'महा-टॅक'च्या एक वर्षाच्या प्रकल्पास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे योजना राबविल्यानंतर निकाल पाहण्याऐवजी योजना सुरू असतानाच तिची दिशा, परिणाम आणि अंमलबजावणी तपासण्याची नवी पद्धत राज्यात लागू होणार आहे.

## संपादकीय....

### शेतकरी, जनता हतबल

महाराष्ट्रात ऑगस्ट महिना आणि सप्टेंबरच्या पहिल्या दोन आठवड्यात अपेक्षित पाऊस पडला नाही. यामुळे येत्या काही काळात अल निनोचा प्रभाव आणखीन तीव्र होणार असल्याने शेतकरी, व जनता पावसाविना हतबल झाली आहेत. १४ सप्टेंबरला राज्यभरात गणेशोत्सवाला सुरुवात झाली. गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला राज्यभरात विविध जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली. त्यामुळे राज्यातील शेतकरी सुखावला आहे. असं असलं तरी राज्यात मुसळधार पाऊस पडताना दिसत नाही. पण आता मुसळधार पावसाची प्रतिक्षादेखील पुढच्या काही दिवसांत संपणार असल्याचा दावा हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी केला आहे. सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसांत राज्यभरात मुसळधार पावसाची शक्यता असल्याचा अंदाज डख यांनी वर्तवला आहे. १६ सप्टेंबरला विखुरलेल्या स्वरुपाचा पाऊस पडेल. १७ आणि १८ सप्टेंबरला पावसात थोडी वाढ होईल. मुंबई, पुण्यातही या दोन दिवसांत पाऊस पडेल. त्यानंतर १९ ते २४ सप्टेंबरच्या पावसाचे आगमन दक्षिण महाराष्ट्रातून होईल. ज्या भागांमध्ये अद्याप अपेक्षित पाऊस पडलेला नाही तिथे पाऊस पडणार आहे, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली. राज्यात १७ आणि १८ सप्टेंबरला बऱ्याच भागांमध्ये जोरात पाऊस पडणार आहे. दक्षिण महाराष्ट्र, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात १९ ते २४ सप्टेंबर दरम्यान पाऊस पडणार आहे. सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, पुणे, बारामती, दौंड, मानखटाव, इंदापूर, बीड, आष्टी, जामखेड, कर्जत, धाराशिव, लातूर, बीड, नांदेड, परभणी, जालना या भागांमध्ये १९ ते २४ सप्टेंबर काळात पााऊस पडेल. दक्षिणेकडे बाष्प सक्रिय झाल्यामुळे वातावरण तयार होईल. तिथून हा पाऊस सुरु होऊन राज्यातील इतर भागांकडे जाईल. हा पाऊस विदर्भात आणि उत्तर महाराष्ट्रातही राहील. २४ सप्टेंबरनंतर विशाखापट्टन येथे समुद्रात एक कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार आहे. त्याचे रुपांतर चक्रीवादळात होणार आहे. त्यामुळे २६ ते ३० सप्टेंबरपर्यंत महाराष्ट्रात पाऊस येणार आहे. हा पाऊस महाराष्ट्रात धुमाकूळ घालणार आहे.

# श्री गणपती बाप्पा : ज्ञानाची, बुद्धीची आणि सामाजिक एकतेची परम देवता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नातेपुते (प्रतिनिधी) : भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर आज घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये श्री गणरायाचे अत्यंत उत्साहात आणि मंगलमय वातावरणात आगमन होत आहे. सनातन संस्कृतीत श्री गणपती बाप्पा हे केवळ विघ्नहर्ता म्हणूनच नव्हे, तर 'ज्ञानमूर्ती' आणि 'प्रज्ञादाता' म्हणून अत्यंत श्रेष्ठ स्थानी विराजमान आहेत. बाप्पाचे मूळ रूप हे अक्षरांचा, शास्त्रांचा आणि सर्व १४ विद्या व ६४ कलांचा उगमस्थान मानले जाते. त्यामुळेच कोणत्याही मंगल कार्याची सुरुवात 'श्री गणेशाय नमः' या महामंत्राने केली जाते.

बाप्पाचे स्वरूप : अथांग ज्ञान आणि विवेकाची शिकवण

श्री गणेशाचे प्रत्येक अंग मानवी जीवनाला सखोल मार्गदर्शन करते. मानवी आयुष्यात केवळ माहितीचा साठा असणे पुरेसे नसून, तिचे 'ज्ञानात' आणि ज्ञानाचे 'विवेकात' रूपांतर करणे गरजेचे असते, हाच मोलाचा संदेश बाप्पाच्या रूपावरून मिळतो:

विशाल मस्तक (गजमुख): अथांग ज्ञान, अफाट विचारशक्ती, सूक्ष्म आकलन आणि विचारांची व्यापकता दर्शवते.

लहान डोळे: प्रखर एकाग्रता, सूक्ष्म निरीक्षण आणि अंतर्दृष्टीचे प्रतीक आहेत.

मोठे कान: ज्ञानी होण्यासाठी प्रथम चांगला श्रोता असणे आवश्यक आहे. सभोवतालचे सर्व नीट ऐकून घेणे आणि योग्य तेच स्वीकारणे, तसेच सच्छास्त्रांचे निरंतर श्रवण करण्याचे महत्त्व कान दर्शवतात.



लंबोदर रूप: बाप्पाच्या पोटात संपूर्ण ब्रह्मांड आणि त्याचे अथांग ज्ञान सामावलेले आहे, जे मनातील अज्ञानाचा अंधार घालवून आत्मज्ञानाचा प्रकाश पाडते.

एकदंत: सर्व संघर्षांवर मात करून ध्येयाप्रती एकनिष्ठ राहण्याचा संदेश देतो.

लांब सोंड: परिस्थितीशी जुळवून घेण्याची वृत्ती (वरींरिलळश्रळीूं) आणि कार्यकुशलता शिकवते.

हातातील आभूषणांचा अध्यात्मिक अर्थ

पाश: माणसाला त्याच्यातील वाईट सवयी, मोह आणि आसक्ती यांपासून बांधून दूर ओढण्याचे हे साधन आहे. ईश्वर भक्ताला संसारातील मोहातून मुक्त करून स्वतःकडे आकर्षित करतो, हे याचे प्रतीक आहे.

अंकुश: उधळलेल्या हत्तीला नियंत्रणात आणण्यासाठी जसा अंकुश वापरला जातो, तसेच मानवी मनातील अनियंत्रित वासना, अहंकार आणि वाईट विचारांवर ताबा ठेवण्याचा संदेश हातात धरलेला अंकुश देतो.

परशू: सर्व प्रकारच्या विघ्नांचे, अज्ञानाचे आणि अहंकाराचे छेदन (नाश) करण्याचे हे शस्त्र आहे. संसारातील बंधने कापून टाकून मुक्तीचा मार्ग दाखवणे हा याचा अर्थ आहे.

ज्ञान-साधना आणि समर्पणाचे मूर्तिमंत रूप

महर्षी व्यासांनी जेव्हा 'महाभारत' हे महाकाव्य रचण्याचे ठरवले, तेव्हा लेखनाची गती खंडित होऊ नये म्हणून ही जबाबदारी खुद्द गणपती बाप्पांनी स्वीकारली. त्यांनी स्वतःचा एक दंत मोडून लेखणी म्हणून वापर करत हे महाकाव्य लिहून पूर्ण केले. हे उदाहरण बाप्पाच्या ज्ञान-साधनेचे, असीम त्यागाचे आणि ध्येयाप्रती असलेल्या समर्पणाचे मूर्तिमंत रूप आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव : सामाजिक एकतेचा पावन यज्ञ

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक सण नसून तो लोकांमध्ये एकता, प्रेम आणि सहकार्याची भावना वाढवणारा सामाजिक उत्सव आहे.

समाज प्रबोधन व सेवा: विविध सार्वजनिक मंडळांद्वारे रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, गरजू घटकांना मदत आणि भारुड व कीर्तनांच्या माध्यमातून समाज प्रबोधनपर उपक्रम राबवून सामाजिक जबाबदारी जपली जाते.

सर्वसमावेशकता: विविध समाज, धर्म आणि पिढ्यांना एकत्र आणून सार्वजनिक गणेशोत्सव सामाजिक एकतेची मजबूत पायाभरणी करतो.

या गणेशोत्सवाच्या पावन पर्वात 'ॐ गं गणपतये नमः' या मंत्राचा नाम जप करत बाप्पाच्या विचारांचा प्रचार करणे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे हीच खरी बाप्पाची भक्ती ठरेल.

वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि सम प्रभ।

निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा।।

गणपती बाप्पा मोरया!



**– ह. भ. प. श्रीराम महाराज भगत**
**नातेपुते, ता. माळशिरस**

# गणेश मंडळाच्या माध्यमातून शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी लोकसंवाद अभियान

**माहिती व जनसंपर्क विभागाचा अभिनव उपक्रम**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम १६ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले असून, या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येणाऱ्या गणेश मंडळाच्या ठिकाणी लोकसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शासनाच्या योजनांची माहिती देण्याबरोबरच नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधणे, आणि पात्र लाभार्थ्यांना संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, हा 'लोकसंवाद-२०२६'चा प्रमुख उद्देश आहे.

या कार्यक्रमांच्या माध्यमातून विविध शासकीय विभागांच्या स्थानिक तसेच जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी नागरिकांना थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात येणार आहे.

विविध विभागांच्या योजनांची माहिती

प्रत्येक जिल्ह्यातील प्रमुख व मानाच्या गणेशोत्सव मंडळांमध्ये 'लोकसंवाद' कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

'लोकसंवाद-२०२६'मध्ये कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, सहकार, पणन, सार्वजनिक आरोग्य, कौशल्य विकास, क्रीडा व युवक कल्याण आदी विभागांसह सर्वच विभागांचा सहभाग असणार आहे.

शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, शेततळे, कृषी औजारांसाठी अनुदान, महिला बचत गट तसेच महिलांसाठी उच्च शिक्षणाच्या युवक आणि विद्यार्थ्यांसाठीच्या शिक्षण, कौशल्य विकास, शिष्यवृत्ती योजना सवलती यासह विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांसह मोफत तपासणी, औषधोपचार व शिष्यवृत्तीशी संबंधित सुविधांची माहिती देण्यात येणार आहे.

कौशल्य विकास क्षेत्रात कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम, स्वयंरोजगार कर्ज योजना तसेच बार्टी, सारथी आणि महाज्योती आदी संस्थांच्या योजनांबाबत युवक व नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.याशिवाय महाडीबीटी, सायबर सुरक्षा, माहितीचा अधिकार, आणि आपले सरकार यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरही जनजागृती करण्यात येणार आहे.

आंतरविभागीय समन्वयावर भर

'लोकसंवाद-२०२६' प्रभावीपणे राबविण्यासाठी कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, सहकार, पणन, कौशल्य विकास, सामाजिक न्याय तसेच पोलीस विभागासह संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्यात येणार आहे.

या कार्यक्रमांमध्ये स्थानिक क्षेत्रीय अधिकारी तसेच जिल्हास्तरीय वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञ प्रत्यक्ष गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी उपस्थित राहून नागरिकांना मार्गदर्शन करतील. त्यामुळे शासनाच्या विविध योजनांबाबत नागरिकांना थेट आणि अधिकृत माहिती उपलब्ध होणार आहे.

कार्यक्रमांना व्यापक प्रसिद्धी

शक्य असेल तेथे कार्यक्रमांचे फेसबुक किंवा युट्यूब लाईव्ह करण्यात येणार असून, सोशल मीडियावर गणेशोत्सव२०२६ आणि लोकसंवाद२०२६ हे हॅशटॅग वापरण्यात येणार आहेत. या माध्यमातून प्रत्यक्ष कार्यक्रमाला उपस्थित राहू न शकणाऱ्या नागरिकांपर्यंतही योजनांची माहिती पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे.

ज्या गणेश मंडळांना या कार्यक्रमात सहभाग घ्यावयाचा आहे त्यांनी त्या त्या जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच मुंबई शहर व उपनगर गणेश मंडळानी माहिती व जनसंपर्क विभाग,मंत्रालय मुंबई येथे संपर्क साधावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क विभागामार्फत करण्यात आले आहे.

# गणेशोत्सवासाठी निफाड पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त; ६२ मंडळांवर 'वॉच'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर निफाड पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी जय्यत तयारी केली आहे. उत्सव काळात अनुचित प्रकार घडू नयेत, तसेच गणेश मंडळांच्या कार्यक्रमांवर बारकाईने लक्ष ठेवता यावे यासाठी पोलिसांकडून विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अशी माहिती निफाड पोलीस ठाण्याच्या निरीक्षक सारिका आहिरराव यांनी दिली आहे

निफाड पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील ३० गावांमध्ये एकूण ६२ गणेश मंडळांनी परवानगी घेतली आहे. यामध्ये निफाड शहरातील २७, तर ग्रामीण भागातील ३५ मंडळांचा समावेश आहे. यापैकी २७ लहान व २१ मोठी गणेश मंडळे आहेत.

तसेच 'एक गाव, एक गणपती' उपक्रमांतर्गत १२ गावांनी सहभाग नोंदविला आहे. गणेशोत्सव काळात गर्दीच्या ठिकाणी विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून, संवेदनशील ठिकाणे, सार्वजनिक ठिकाणे तसेच गणेश मंडळांच्या परिसरात पोलिसांची गस्त वाढविण्यात आली आहे. मंडळांनी प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे, ध्वनिक्षेपकाचा निर्धारित मर्यादेत वापर करावा आणि सामाजिक सलोखा कायम ठेवावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक सारिका आहिरराव यांनी केले आहे.



**कार्यक्षेत्रातील १२ गावांमध्ये एक गाव एक गणपती – सारिका अहिरराव**

बंदोबस्तासाठी निफाड पोलीस ठाण्याचे ३ पोलीस अधिकारी व ३० पोलीस अंमलदार, तसेच मुंबई रेल्वे पोलिसांचे ५ कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय निफाड पथकातील ३८ होमगार्ड बंदोबस्तासाठी उपलब्ध राहणार आहेत. यासाठी सा.पो. निरक्षक सोनल फडोळ,धनंजय जाधव, नितीन सांगळे, अरविंद ढवळे, कपालेश्वर ढिकले आदी पोलीस कर्मचारी प्रयत्नशील आहेत उत्सव काळात कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे गणेशोत्सव शांततेत व उत्साहात पार पडावा यासाठी निफाड पोलिसांकडून प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह मंडळांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील सोहेल काझीची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अंपायर पॅनेलवर निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



प्रतिनिधी/पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथील एम.कॉम. भाग-२चा विद्यार्थी सोहेल काझी याने महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अंपायर परीक्षेत यश संपादन करून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अंपायर पॅनेलमध्ये स्थान मिळविले आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडून अंपायर पॅनेलसाठी परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेत यशस्वी झालेल्या अंपायर्सना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या सामन्यांमध्ये अंपायर म्हणून काम करण्याची संधी मिळते.

क्रिकेट क्षेत्रातील अंपायरिंगसारख्या महत्त्वपूर्ण आणि जबाबदारीच्या भूमिकेसाठी आवश्यक असलेली परीक्षा उत्तीर्ण करून सोहेल काझी याने आपल्या क्रीडा कारकिर्दीत आणखी एक उल्लेखनीय टप्पा गाठला आहे. खेळाडू म्हणून मैदानावर योगदान दिल्यानंतर आता अंपायर म्हणून मैदानावर निर्णय देण्याची नवी जबाबदारी त्याच्यावर आली आहे. त्याच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. सोहेल काझी याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, सर्व विभागांचे उपप्राचार्य, सर्व विभागप्रमुख, जिमखाना विभागप्रमुख प्रा. अनिल परमार, प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांनी त्याचे अभिनंदन करून त्याच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी, शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करून विद्यार्थ्यांनी नवनवीन संधी मिळवाव्यात, यासाठी महाविद्यालय सदैव प्रोत्साहन देत राहील, असे मत व्यक्त केले.

सोहेल काझीच्या या यशामुळे महाविद्यालय परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्याच्या पुढील अंपायरिंग कारकिर्दीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# खैरखेडच्या जि. प. शाळेचा लोकसहभागातून १८ लाखांचा ऐतिहासिक कायापालट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेड राजा तालुक्यातील अत्यंत दुर्गम भागात वसलेल्या छोट्याशा खैरखेड येथील जिल्हा परिषद शाळेने अवघ्या एका वर्षात विकासाची एक नवी व्याख्या रचली आहे. एकेकाळी मूलभूत सुविधांच्या प्रतीक्षेत असलेल्या या शाळेने लोकसहभाग, ग्रामस्थांचा विश्वास आणि शिक्षकांच्या जिद्दीच्या बळावर तब्बल १८ लाख रुपयांहून अधिक निधीतून कायापालट करून दाखवला आहे.

**जिल्हा परिषद शाळेत सर्व सामान्याच्या मुलाला मोफत शिक्षण मिळावे यासाठी आमदार मनोज भाऊ कायंदे यांनी तत्पर निधी उपलब्ध करून दिला.**

एकलव्या'च्या जिद्दीतून उभी राहिली 'सुंदर शाळा'

मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात शिक्षक श्री. प्रभाकर गायकवाड यांची बदलीने या शाळेवर नियुक्ती झाली. १ ते ४ वर्गांचे अध्यापन आणि मुख्याध्यापक पदाची संपूर्ण प्रशासकीय जबाबदारी त्यांनी एकट्याने खांद्यावर घेतली. 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या आपल्या पूर्वश्रमीच्या चांगेफळ शाळेचा पॅटर्न डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी खैरखेडचा कायापालट करण्याचा ध्यास घेतला. गावकऱ्यांना विश्वासात घेऊन लोकवर्गणी व सहकार्याची मुहूर्तमेढ रोवली.

सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज भाऊ कायंदे यांनी सर्व सामान्यांच्या मुलांना शिक्षण घ्यावे यासाठी सिंदखेडराजा मतदारसंघातील खैरखेड जिल्हा परिषद शाळेसाठी १०लाख रुपये शाळेच्या वाल कंपाऊंड साठी तत्पर निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल गावकऱ्यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहे.



१८ लाखांच्या विकासकामांचा लेखाजोखा:

४ नवीन शौचालये (२ चे काम प्रगतीपथावर) ₹ ७,००,०००

शाळेला पक्के वॉल कंपाऊंड (सुरक्षा भिंत) ₹ १०,००,०००

पडक्या खोलीची दुरुस्ती (सुसज्ज कार्यालय व ग्रंथालय) ₹ ६०,०००

सुंदर रंगमंच उभारणी ₹ ६,०००

वृक्षारोपण व परिसर सुशोभीकरण ₹ ८,०००

शाळेची भव्य कमान ₹ ६,०००

संपूर्ण परिसरात पाणी पाईपलाईन ₹ ५,०००

आकर्षक रंगरंगोटी ₹ ६,०००

विद्यार्थ्यांसाठी रॅम्प व लोखंडी गेट ₹ ४,०००

डिजिटल शैक्षणिक साहित्य व हॅण्ड वॉश स्टेशन ₹ ५,०००

तत्पर नेतृत्व आणि सर्वसमावेशक साथ

या अभूतपूर्व विकासात सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. मनोजभाऊ कायंदे , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मदन आघाव, गावच्या सरपंच रुक्मिणी इलग, सचिव काजल राठोड मॅडम यांचे मोलाचे योगदान लाभले. तसेच केंद्र प्रमुख विलास आघाव सर, केंद्र प्रमुख कंकाळ सर यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक आंधळे सर, पालक वर्ग आणि ग्रामस्थांनी या मोहिमेत खांद्याला खांदा लावून काम केले.

भेंडवळ व चांगेफळ शाळेप्रमाणेच खैरखेडच्या या जि. प. शाळेला संपूर्ण तालुक्यात एक मॉडेल व 'सुंदर शाळा' म्हणून नावारूपाला आणण्यासाठी मुख्याध्यापक प्रभाकर गायकवाड सर आणि शा. व्य. स. अध्यक्ष मदन आघाव अहोरात्र परिश्रम घेत आहेत. या दुर्गम शाळेने घेतलेली ही उत्तुंग भरारी संपूर्ण जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# नळदुर्गकरांचा दुर्लक्षपणा अन् प्रशासनाचा निष्काळजीपणा नळदुर्गकरांना भोवणार

## नळदुर्ग मध्ये पाणी प्रश्न पेटला; बोरी धरणात केवळ ८ टक्के जिवंत पाणीसाठा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग शहराला आगामी काळात तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नळदुर्गच्या पाणी पुरवठ्याचा प्रमुख आधार असलेल्या कुरनूर प्रकल्प अर्थात बोरी धरणात सध्या केवळ ८ टक्के जिवंत पाणीसाठा शिल्लक असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने शहरातील पाणी पुरवठ्याचे नियोजन प्रशासना समोर मोठे आव्हान ठरणार आहे.

बोरी धरणातून सिंचनासाठी कालव्याला सातत्याने पाणी सोडण्यात आल्याने धरणातील पाणीसाठा कमी झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. पाण्याचा काट कसरीने वापर आणि उपलब्ध साठ्याचे योग्य नियोजन वेळेत करण्यात आले असते, तर आज निर्माण झालेली परिस्थिती काही प्रमाणात टाळता आली असती, अशी नागरिकांतुन भावना व्यक्त करताना दिसत आहेत

दरम्यान, बोरी धरणातून सिंचनासाठी होणाऱ्या अनधिकृत पाणी उपशावर नियंत्रण आणण्यासाठी पाटबंधारे विभागाच्या विशेष भरारी पथकाने कारवाई सुरू केली आहे. या कारवाईत आतापर्यंत दहा विद्युत पंप जप्त करण्यात आल्याची माहिती असून, काही ठिकाणी पाईप लाईन व केबल काढण्याची कारवाई ही करण्यात येत आहे. मात्र, ही कारवाई धरणातून कालव्याला पाणी सोडले जात होते धरणातील पाणीसाठा म ोठ्या प्रमाणात कमी होत होता हा साठा कमी होण्यापासून रोखता आला असता परंतू ऐवढी निर्भयता कोणात ही नाही , असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. पाणी संपत आल्यानंतर प्रशासनाला जाग का आली, असा प्रश्नही नागरिकांतून विचारला जात आहे.

बोरी धरण उशाला, अन् कोरड पडली घशाला

बोरी धरणात पुरेसा पाणीसाठा असताना ही नळदुर्ग शहराला साधारण दहा दिवसांच्या आड पाणीपुरवठा केला जात होता आता धरणात केवळ आठ टक्के पाणीसाठा असून शिल्लक राहिल्याने भविष्यात नागरिकांना किती दिवसाच्या अंतराने पाणी मिळणार हा गंभीर प्रश्न नळदुर्गकरांसाठी निर्माण झाला आहे ,बोरी धरण उशाला आणि कोरड पडली घशाला या म्हणी प्रमाणे परिस्थिती नळदुर्गकरांवर ओढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पाऊसमान आणि उपलब्ध पाणी साठ्याचा आढावा घेऊन पाण्याचे नियोजन करणे आवश्यक असताना बोरी धरणातून तब्बल चार महिने कालव्यात पाणी सोडण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे त्यामुळे बोरी धरणातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात खालावली असून कुरनूर प्रकल्प अर्थात बोरी धरण कोरडा पडण्याच्या मार्गावर असल्याची चिंता व्यक्त होत आहे नदीकाठच्या शेतकऱ्याने वापरलेल्या विद्युत मोटारी जप्त करण्याची कारवाई सध्या सुरू आहे मात्र कालव्यात पाणी सोडल्यामुळे धरणातील साठा कमी होत असताना अशी कारवाई का करण्यात आली नाही असा सवाल नागरिकांतून बोलला जात आहे . दरवर्षी चांगला पाऊस पडेल या ग्रस्तिकावर पाण्याचे नियोजन करण्या ऐवजी उपलब्ध पाणीसाठा आगामी पावसाचा अंदाज आणि शहराची पिण्याच्या पाण्याची गरज यांचा विचार करून सिंचनासाठी पाणी सोडण्याची नियोजन करण्या ऐवजी होते यामध्ये पाटबंधारे विभागा बरोबर नळदुर्ग नगर परिषदेच्या संबंधित प्रशासनाची जबाबदारी असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत सध्या बोरी धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने नळदुर्ग शहराच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन प्रशासनाचे मोठे होऊन बनले आहे नागरिकांचा दुर्लक्षपणा आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा याचा फटका आगामी काळात नळदुर्गकरांना बसण्याची दाट शक्यता असून पाणीटंचाई निर्माण होण्यापूर्वी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात असे नागरिकांतून बोलले जात आहे.

# यशसिद्धी आजी-माजी सैनिक वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य शाखा सोलापूर तर्फे वार्षिक मीटिंग संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (प्रतिनिधी) : ग्रीन वूड हॉटेल सुरेगाव सोलापूर येथे यशसिद्धी आजी माझी सैनिक वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य शाखा सोलापूर यांची मीटिंग १३ सप्टेंबर वार रविवार रोजी ठीक सकाळी ११ वाजता आदरणीय कमलाकर कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली प्रथमता चीफ गेस्ट आदरणीय शिवपुत्र घटकांबळेजी व ग्रीनहोडचे मालक आदरणीय मुकुंद जाधव सर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आदरणीय जयानंद कांबळे जिल्हा उपाध्यक्ष यांनी प्रस्ताविका मांडले. तसेच संघटनेचे कोषाध्यक्ष बाबुराव बेल भंडारे साहेब यांनी सर्व वर्षाचा जमा खर्च याच्या बद्दल माहिती दिली त्यानंतर सर्व सदस्यांचे मनोगत व त्यांचे सुजव मांडण्यात आले. त्यानंतर आदरणीय शिवपुत्रजी घटकांबळे यांनी संघटनेचे चाललेले कार्य व पुढील होणारे कार्य व महार रेजिमेंटचे ८६ व्या स्थापना दिवसाच्या अनुषंगाने व येणारे भविष्यकाळातील वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या मार्गदर्शन केले. तसेच सोलापूर शाखेसाठी जेवढी होईल तेवढे संघटने कडून मदत करण्याचे आश्वासन दिले .त्यानंतर नूतन जिल्हा सचिव पदी आयु. विद्याधर ढोणे यांची आणि सहसचिव पदी आयु. विष्णू वाघमारे यांची निवड करण्यात आली. आदरणीय जयानंद कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष कमलाकर कांबळे यांनी सदस्याचे आलेले पॉईंट याच्यावर माहिती दिली व संघटना कशा प्रकारे वाढवायची आपल्यामध्ये कशी एकी ठेवावी आणि सैनिकांचे भविष्यासाठी आपल्या मुलांना कसे प्रगतीपथावर घेऊन जायचे याच्याबद्दल मार्गदर्शन केले या कार्यक्रमास खालील मान्यवर उपस्थित होते. कमलाकर कांबळे, शिवपुत्र घटकांबळे, जयानंद कांबळे, बाबुराव बेल भंडारे ,मारुती माने, सूर्यकांत गजघाटे ,राहुल साबळे, सनम माने, लिंबाजी कांबळे ,विष्णू वाघमारे, चंद्रकांत बनसोडे ,सुरेश खळसोडे , शंभूदेव सूर्यवंशी , मसन्न मनोरे, भाऊसाहेब वंजारे, विद्याधर ढोणे, नागनाथ शिंदे, प्रकाश गटकांबळे, गुंडू केंगार, मल्लिकार्जुन धसाडे, महादेव शिवशरण, गणपती आईवळे. त्यानंतर जेवणाचा आस्वाद घेण्यात आला व खेळीमेळीने मीटिंग संपन्न झाली.



# विद्यार्थ्यांच्या दाखल्यातील त्रुटीमुळे शिक्षण बाधित होऊ नये; रिपाइं व मानव सेवा फाउंडेशनची शासनाकडे राज्यस्तरीय परिपत्रक काढण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट(प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्यातील इयत्ता १० वी सह सर्व विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड, जन्मदाखला व इतर शासकीय कागदपत्रांमधील किरकोळ त्रुटींमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण, परीक्षा अर्ज व पुढील शैक्षणिक संधी बाधित होऊ नयेत, यासाठी राज्यस्तरीय विशेष आदेश/परिपत्रक तातडीने काढण्यात यावे, अशी ठाम मागणी रिपाइं(आठवले)व मानव सेवा फाउंडेशनच्या वतीने मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त, जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

वरील विषयाचे निवेदन आज अक्कलकोटचे निवाशी तहसिलदार जुबेर नदाफ व सहायक प्रशासनाधिकारी महेश रुपनर यांच्याकडे रिपाइंचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी व मानव सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष दत्ता कांबळे देवून म्हंटले आहे की, अनेक विद्यार्थ्यांच्या आधार कार्डवर नावाची स्पेलिंग चुकीची आहे, काहींवर वडिलांचे नाव जोडलेले आहे, तर काही विद्यार्थ्यांकडे जन्मदाखला उपलब्ध नाही. अशा किरकोळ त्रुटींमुळे शाळांकडून डडउ बोर्डाचा फॉर्म स्वीकारला जात नाही किंवा दुरुस्ती करून आणण्यास सांगून विद्यार्थी व पालकांना म ानसिक त्रास दिला जात आहे.

सदर निवेदनावर रिपाइंचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,मानव सेवा फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दत्ता कांबळे,दुधनीचे माजी उपनगराध्यक्ष विजय मानकर,गळोरगीचे सरपंच शंकर बनसोडे,पत्रकार समाधान अहिरे,दुधनीचे पत्रकार निंगप्पा निंबाळनिंबाळ आदी सह इतरांचे सह्या आहे. या प्रसंगी पंचायत समितीचे कनिष्ठ प्रशासनाधिकारी डि एन् परिचारक व एस बी मठ या अधिकारी उपस्थित होते.

कागदपत्रातील चूक विद्यार्थ्याची नसते. आधार नोंदणी लहान वयात पालकांनी किंवा यंत्रणेने केलेली असते. शासकीय यंत्रणेच्या चुकीची शिक्षा विद्यार्थ्याने आपल्या भविष्याने का मोजावी? असा सवाल ही उपस्थित केला आहे.विशेषतः इतर राज्यातून महाराष्ट्रात शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना ही अडचण अधिक भेडसावते. दुसऱ्या राज्यातील कागदपत्र दुरुस्तीसाठी वारंवार त्या राज्यात जावे लागते, प्रक्रिया खर्चिक व वेळखाऊ आहे. तोपर्यंत विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाण्याची भीती असते.खालील अडचणी प्रामुख्याने दिसते.

१. आधार व जन्मदाखल्यातील त्रुटींमुळे डडउ फॉर्म भरतांना २. जन्मदाखला नसल्यास शाळेचा ऋशपशीरश्र ठशसळीींशी (ऋ.ठ.) व पूर्वीच्या नोंदी धरतांना. ३. नावात सातत्य असल्यास पालकांचे प्रतिज्ञापत्र/अफिडेव्हिट स्वीकारून शिक्षण सुरू ठेवावे. ४. दुरुस्ती प्रक्रिया व परीक्षा प्रक्रिया स्वतंत्र ठेवाव्यात. ५. प्रत्येक जिल्ह्यात 'विद्यार्थी दस्तऐवज सहाय्यता कक्ष' सुरू करावा. ६. विद्यार्थ्यांच्या कागदपत्रातील त्रुटीमुळे शिक्षण बाधित होणार नाही या तत्त्वावर राज्यस्तरीय ऋठ काढावा.

विद्यार्थी वाचला तर शिक्षण वाचेल, शिक्षण वाचले तर भविष्य वाचेल या भूमिकेतून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा विद्यार्थ्यांच्या हितासाठी आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागेल, असा इशाराही यावेळी रिपाइं व फाऊंडेशनच्या वतीने देण्यात आला आहे.

# अकलूज पोलिसांची धडाकेबाज कारवाई सराईत घोरपडी टोळीचा पर्दाफाश; १०.९२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : अकलूज पोलीस ठाण्याच्या पुणे प्रकटीकरण पथकाने धडाकेबाज कारवाई करत घरपोडी करणाऱ्या सराईट ओळींचा परदफास केला आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून एकूण १०,९२,२२० रुपयांचा सोन्याचा मध्यमान जप्त केला आहे. फरार आरोपी आकाश चव्हाण, सुरज चव्हाण हे राहत्या घरी असली जी माहिती मिळताच शतपीने ताब्यात घेतली व ११ सप्टेंबर २०२६ रोजी आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे पंढरपूर व विभागाच्या अप्पर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके आणि अकलूज येथील पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नीरजोबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम पोलीस हेड कॉन्स्टेबल विनोद साठे शिवकुमार मध्यभावी राहुल रणवरे तुषार बबलू गाडी दत्तात्रय खरात अनुराधा अडगळी सोमनाथ माने पंडित गवळी तुकाराम माने देशमुख विजय तवटे तसेच सायबर पोलीस ठाण्याचे अजित सुरवसे व स्वप्नील जाधव यांनी केले आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम करीत आहेत.

आठ ऑगस्ट ते नऊ ऑगस्ट २०२६ दरम्यान निवळी तालुका माळशिरस येथील फिर्यादी जितेंद्र जयवंतराव इनामदार यांच्या बंद घराचे कडे कोयंडे तोडून अज्ञात चोरट्याने घरातील सुमारे १,५५००० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेली होती याप्रकरणी अकलूज पोलीस ठाण्यात गु.रा.न.५४३/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५(अ)३३१(३)३३२(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासाच्या दरम्यान गुना प्रकटीकरण पथकाने सीसीटीव्ही फुटेज तांत्रिक विश्लेषण (उऊ) आणि बातमीदारांच्या मदतीने संशयित आरोपी सागर दिलकुश काळे वय ३६ राहणार जरुरी पंढरपूर याच ताब्यात घेतली त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी आपले साथीदार आकाश उर्फ पप्पा संभाजी चव्हाण वय ३५ आणि सुरज उर्फ दम्या रवी चव्हाण वय २४ वर्षे दोघे राहणार पडसाद सांगवी तालुका पंढरपूर यांच्या मदतीने नेवरे यशवंतराव स्वरूप नगर परिसरातील घरफोडी केल्याची कबुली दिली, चोरलेली दागिने करकम येथील श्रीराम श्रीराम गोल्ड सिल्वर पॅलेस चे मालक शिवराज दीपक गोडसे यांना विकल्याचे निष्पन्न झाल्याने सोनाराकडून सुमारे १,९२,२२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.



# पेपर फुटीच्या विरोधात संभाजी ब्रिगेडने आक्रोश आंदोलन



प्रतिनिधी/पंढरपूर : MPSC पेपर फुटीच्या विरोधात संभाजी ब्रिगेडने आक्रोश आंदोलन केले वचझडउ चे सचिव यांना काळी फासणाऱ्या संभाजी ब्रिगेडच्या मावळ्यांची जोरदार समर्थन केले व तसेच राज्य सरकारचा निषेध केला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य किरण राज घाडगे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब बागल, व पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे अध्यक्ष अमोल कुंभार, जिल्हा अध्यक्ष अमोल कुंभार जिल्हा उपाध्यक्ष किरण कचरे प्रकाश गायत्री जिल्हा सचिव स्वप्नील गायकवाड तालुकाध्यक्ष पंढरपूर विभाग शेखर आटकळी तालुका अध्यक्ष करकम विभाग राजेंद्र पवार पंढरपूरचे अध्यक्ष विजय पवार तालुका सचिव सोमनाथ कदम प्रसाद सातपुते सर धनंजय मोरे गोपी वाडदेकर महेश पवार अभिजीत भिंगारे. ओंकार भिंगारे वैभव यादव किशोर मुळे ऋषिकेश रोकडे विक्रांत बोडके प्रशांत माळी विनायक पिसे सिद्धांत जाधव शुभम साठे देशमुख इत्यादी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीचझडउ पेपर फुटी विरोधात आंदोलन झाले.

**नामवंत गायक-गायिकांच्या सुरेल गायनाने रंगणार सहा दिवसीय संगीत महोत्सव**

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने गणेशोत्सव संगीत महोत्सवाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांच्या वतीने श्री गणेशाच्या आगमनानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही सहा दिवसीय गणेशोत्सव संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा संगीत महोत्सव श्री संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे सायंकाळी ७.३० वाजता होणार असून, नामवंत गायक-गायिकांच्या सुरेल गायनाची मेजवानी पंढरपूरकर कलारसिकांना मिळणार आहे.

मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह. भ. प. गहिनीनाथ महाराज औसेकर, सर्व सन्माननीय सदस्य, कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव व व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्या मार्गदर्शनाखाली या संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

संगीत महोत्सवामध्ये मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी भजनसम्राट शंकरराव वैरागकर (नाशिक) यांचा 'स्वरविठ्ठल', बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ख्यातनाम गायक जयतीर्थ मेऊंडी (हुबळी) यांचा 'अभंगरंग' हा कार्यक्रम सादर होणार आहे.




तसेच रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी स्वाती रांजेकर यांचा 'करावा विठ्ठल', सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी पंढरपूरचे स्थानिक कलाकार गणेश गोडबोले यांचा 'स्वरपंढरी', मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी श्रुती पाटील (मुंबई) यांचा 'विठ्ठल वारी' आणि बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी उन्मेष शहाणे (सोलापूर) प्रस्तुत 'कल्चर शिदोरी' या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी गायनसेवा अर्पण करण्यासाठी येणाऱ्या या नामवंत कलाकारांच्या सादरीकरणामुळे पंढरपूरच्या सांस्कृतिक वातावरणात भक्ती, संगीत आणि अध्यात्माचा सुरेल संगम अनुभवता येणार आहे.

या गणेशोत्सव संगीत महोत्सवाचा पंढरपूरकर तसेच परिसरातील कलारसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आस्वाद घ्यावा, असे आवाहन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

## कृषि विभागाकडून दुर्लक्ष; शासनाचाही उदासिन भूमिका



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रविण म. कसबे/मोहा प्रतिनिधी

कळंब तालुक्यासह मोहा परिसरात निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.मात्र कृषी विभाग याकडे दुर्लक्ष करत असून शासनही उदासिन भुमिका घेत आहे.

यावर्षी जून महिन्यात सुरवातीची पावसाची नक्षत्रे बाद ठरली असून या काळात पुरेसा पाऊस पडला नाही.अल्पशा पावसावरच शेतकऱ्यांनी खरीपाच्या पेरण्या केल्या मात्र नंतर पावसाने दगा दिल्याने अनेक शेतकऱ्यांना दुबार पे-रणीला तोंड द्यावे लागले.

महागडी बी- बियाणे,खते औषधे खरेदी करून सलाईन सारख्या पडणाऱ्या पावसा-वरच नगदी प्रमुख समजल्या जाणाऱ्या सोयाबीन पीकासह मुग, मका, उडीद,तुर अशा पीकांचा शेतकऱ्यांनी पेरा केला. मुग, मका, उडीद हि पीके तर या सलाईन सारख्या पडणाऱ्या अल्प पावसाने अल्प काळातच करपून हातची गेली.

सोयाबीनच्या पीकावर शेतकऱ्यांची मोठी आशा होती.मात्र पावसाळ्याच्या भर हंगामात जवळ - जवळ पावसाने दिड महिन्याचा खंड पडल्याने उन्हाळ्या सारख्या पडणाऱ्या उन्हाच्या तडाख्याने हे सोयाबीन पीक पुर्णपणे करपून उद्ध्वस्त झाले.परिणामी कळंब तालुक्यातील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याने बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.तसेच पाचशे ते सहाशे फुट खोल असणाऱ्या बोअरच्या पाण्यानेही कमालीचा तळ गाठला आहे.परिसरातील विहिरी तर कोरड्याठाक पडल्या आहेत.परिणामी पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला असल्याने पुढील काळात काय करायचे या धास्तीने बळीराजा धास्तावला आहे.

तालुक्यात ऊस,केळी, कांदा या पिकांचेही पावसाअभावी करपल्याने प्रचंड नुकसान झाले आहे.या सर्व पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून किंवा सरसकट नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत कृषी विभाग अक्षम्य दुर्लक्ष व शासनही संथ गतीची भुमिका घेत असल्याची संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

# चिंबीपाडा जि.प. शाळेला प्रफुल्ल शेलार यांच्याकडून वॉटर फिल्टर भेट



ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील पडघ्याजवळील चिंबीपाडा येथील जिल्हा परिषद मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते तथा शिक्षणप्रेमी प्रफुल्ल शेलार यांनी शाळेला वॉटर फिल्टर (क्का) बसवून दिला.

या उपक्रमातून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या आरोग्याचीही काळजी घेतली आहे. चिंबीपाडा जिल्हा परिषद शाळेत अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, शाळेत शुद्ध पिण्याच्या पाण्याची पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्याने ही बाब लक्षात घेऊन प्रफुल्ल शेलार यांनी पुढाकार घेत शाळेसाठी वॉटर फिल्टरची व्यवस्था करून दिली. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता शुद्ध पिण्याचे पाणी सहज उपलब्ध होणार असून, त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही ही सुविधा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शाळेच्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांना प्रफुल्ल शेलार यांचे नेहमीच सहकार्य लाभत असते. त्यांच्या या उपक्रमाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापिका, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका पुष्पा सोनावने, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, शिक्षक तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरात पोलिस प्रशासनाचे मॉकड्रिल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच काही अनुचित प्रकार घडल्यास या प्रसंगाला पोलिसांनी कसे सामोरे जायचे व परिस्थिती कशी नियंत्रणात आणायची यासंदर्भात .पंढरपूर शहर पोलीस ठाणे, पंढरपूर ग्रामीण ,व तालुका पोलीस ठाणे यांनी संयुक्तपणे रेल्वे मैदान पंढरपूर येथे मॉकड्रिल अर्थात दंगा काबू योजना रंगीत तालीम घेण्यात आली.

पंढरपूर शहर व तालुक्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरा होणार आहे. गेल्या काही वर्षापासून गणेशोत्सवाचे स्वरूप अधिक व्यापक झाले असून यंदा पंढरपूर शहर व तालुक्यात सार्वजनिक मंडळे व घरगुती गणपतींची अतिशय भक्तिभावाने प्रतिष्ठापना केली जाते. हा दहा दिवसांचा उत्सव पूर्णपणे निर्विघ्न, सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात पार पडावा यासाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे.

उत्सवाच्या काळात आगमन व विसर्जन मिरवणुका, भव्य देखावे आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांमुळे शहरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होते. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच संभाव्य आपत्कालीन किंवा तणावपूर्ण परिस्थितीवर वेळीच नियंत्रण मिळवता यावे, यासाठी पोलिस प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत.

पोलीस प्रशासनाच्या वतीने 'दंगल नियंत्रण योजने'अंतर्गत (मॉक ड्रिल) एक विशेष रंगीत तालीम घेण्यात आली. यामध्ये दहा पोलीस अधिकारी व ५५ ठाणे अंमलदार यांनी सहभाग घेतला होता.

# लातूर ग्रामीण जिल्हा काँग्रेसच्या सचिवपदी ज्ञानोबा गोडभरले यांची निवड



प्रतिनिधी/अमर जाधव : लातूर जिल्ह्यात काँग्रेसचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशाने व काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभय दादा साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पक्ष संघटन वाढीसाठी व पक्षाला बळकटी देण्यासाठी काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या काल निवडी करण्यात आल्या.

लखनगाव येथील काँग्रेस पक्षाच्या विचारांशी एकनिष्ठ असलेले व अनुभवी राजकीय वाटचाल असलेले ज्ञानोबा गोडभरले यांची काँग्रेस पक्षाच्या सचिव पदी नियुक्ती करण्यात आली.

ज्ञानोबा गोडभरले यांनी लखनगाव येथून आपल्या राजकीय जीवनाची वाटचाल करत असताना लखनगाव ग्रामपंचायत मध्ये सलग दहा वर्षे सरपंच पद भूषवत ग्रामसेवा केली आहे. प्रत्येक निवडणुकीत आपली जबाबदारी पार पाडत काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहत आपली जबाबदारी पार पाडणारे ज्ञानोबा गोड भरले यांच्या कार्याची दखल घेऊन पक्षाने त्यांना काँग्रेस जिल्हा सचिवपदी काम करण्याची संधी दिली आहे.

ॲड भालचंद्र पाटील. सतीश शिंदे. अरुण व्हदाडे प्रदीप कदम. बंडू कदम. भगवान लांडगे.सरपंच भेटा शाम शेळके. रमाकांत कांबळे. गोविंद जाधव. सरपंच राहुल पाटील. सरपंच ज्ञानदेव जंगाले. दिनकर कवठे. गोरख कसबे.संतोष सूर्यवंशी.सह लखनगाव ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# कोणतेही काम प्रामाणिकपणे आणि निष्ठेने केल्यास त्यात यश निश्चित मिळते : धमेंद्र माने



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के. गायकवाड):

आपण कोणतेही काम, उद्योग किंवा सामाजिक, राजकीय,धार्मिक चळवळीतील कार्य प्रामाणिकपणे आणि निष्ठेने केल्यास त्यात यश निश्चित मिळते.तेव्हा तरुणांनी आत्मविश्वासाने व प्रामाणिकपणे आणि निष्ठेने छोटे-मोठे उद्योग सुरु करून बेरोजगारीवर मात करावी असे प्रतिपादन सोलापूर येथील उद्योजक शकुंतला लॉजचे मालक चालक तथा सेवानिवृत्त सहशिक्षक धमेंद्र माने यांनी इटकळ तालुका तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

दि.१४ सप्टेंबर २०२६ रोजी सराठी तालुका तुळजापूर येथील मूळ रहिवासी असलेले व सध्या पुणे येथे वास्तव्यास असलेले सेवानिवृत्त माझी सैनिक सुभेदार सुरेश हरिबा सुरवसे व सुरवसे परिवाराच्या वतीने तुळजापूर तालुक्यातील इटकळ ते अक्कलकोट या मुख्य रस्त्या लगत येथील साई मंगल कार्यालया इतकळ जवळ दुकान गाळे बांधले असून त्या नवीन सुरवसे दुकान गाळ्याच्या उद्घाटन समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी उद्घाटक म्हणून महेंद्र माने बोलत होते. प्रारंभीर तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून येथील नूतन सुरवसे दुकान गाळ्याचे उद्घाटन उद्योजक महेंद्र माने, पोलीस निरिक्षक राकेश बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्षा राजश्रीताई कदम,भारतीय बौद्ध महासभेचे बाळासाहेब बागडे,ज्ञानदेव बनसोडे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, रिपाइं नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे,सहशिक्षिका पल्लवी माने,भटक्या विमुक्त पारधी समाज संघटनेचे नेते पंडीत भोसले,आदींची शुभेच्छा पर भाषणे झाली.

या वेळी रामभरोसे हॉटेलचे मालक शंकर वाघमोडे,श्रध्दा बार चे चालक खंडेराव बंडगर (नाना),सराटी ग्रा.प.चे माजी सरपंच प्रकाश जेवळे, माजी उपसरपंच शहाजी गायकवाड, जेष्ठ कार्यकर्ते तथा सराटी ग्रा.प. विद्यामान सदस्य महादेव सुरवसे,शेकूंबर फकीर,तय्यब मुजावर

सहशिक्षक बसवेश्वर परकाळे,निलेगावचेग्रा.प.सदस्य गोवर्धन दुपारगुडे, युवा कार्यकर्ते सुदर्शन गायकवाड,प्रदीप भोसले महिला कार्यकर्त्या अर्चनाताई माने, जयाताई सुरवसे,मातोश्री शकुंतला माने,सुंदरबाई खंडेराव बंडगर,शुभांगी बनसोडे सह १ ग्रामस्थ युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के.गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन युवा उद्योजक तथा अभियंता अक्षय सुरवसे यांनी केले.

### वह्या, लेखन साहित्य किटचे वाटप

### शिक्षकांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

# आशा (रोहिणी) विद्याधर जाधव यांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

आशा (रोहिणी) विद्याधर जाधव यांच्या स्मरणार्थ भिवंडी तालुक्यातील कोशिंबी केंद्रातील जिल्हा परिषद शाळा कांदळी व जिल्हा परिषद शाळा कातकरी वाडी कांदळी येथील विद्यार्थ्यांना वह्या व लेखन साहित्य किटचे वाटप तसेच शिक्षक सन्मान सोहळा १२ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा परिषद शाळा कांदळी येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठित ग्रामस्थ भागोजी जाधव होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचे शाळेच्या वतीने गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा कांदळी व कातकरी वाडी कांदळी येथील प्रत्येक विद्यार्थ्याला चार वह्या, अशा एकूण १८८ वह्यांचे तसेच ४७ लेखन



साहित्य किटचे वाटप करण्यात आले. अंगणवाडीतील विद्यार्थ्यांनाही चित्रकला वही व रंगपेटी देण्यात आली.

यावेळी केंद्रप्रमुख पूजा परदेशी, वरिष्ठ शिक्षिका जयश्री पष्टे, शिक्षक अशोक गायकवाड, वरिष्ठ शिक्षक गुरुनाथ देसले आणि शिक्षिका वंदना कदम यांचा भारतीय संविधानाची प्रत, पेन, शाल व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमप्रसंगी माजी सेक्रेटरी, ज्येष्ठ नागरिक संस्था वासिंद - भिरूड गुरुजी, सेवानिवृत्त पीएसआय सुशिलकुमार दोंदे, केंद्रप्रमुख पूजा परदेशी, चेअरमन, सरस्वती विद्यालय वासिंद राजेंद्र भेरे, उपप्राचार्य, सरस्वती विद्यालय वासिंद संजीव जाधव, माजी संचालक, सरस्वती विद्यालय वासिंद अविनाश गुप्ते, सदस्य, ज्येष्ठ नागरिक संस्था वासिंद दुलाराम पेंढारी, माजी चेअरमन, सरस्वती विद्यालय वासिंद व विद्यमान संचालक, खातिवली वासिंद सेवा सहकारी सोसायटी - विद्याधर जाधव तसेच एलआयसी डेव्हलपमेंट अधिकारी, कल्याण - संजीवकुमार शिंदे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सरपंच, कांदळी ग्रामपंचायत नम्रता जाधव, योगेश धनगर, स्नेहल शिंदे, जागृती धनगर, विनोद जाधव, अनुसया कांबळे, वैभवी जाधव, अक्षय जाधव, यज्ञेश जाधव, अंगणवाडी सेविका कविता जाधव, अंगणवाडी मदतनीस गोदावरी जाधव व श्रावस्ती शिंदे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# पुणे पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीची पडघम वाजण्यास सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुणे पदवीधर व शिक्षक मतदार संघाची पडघम वाजू लागले असून, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान नोंदणी बरोबरच राजकीय मोर्चे बांधण्यांना वेग आला आहे. दोन्ही मतदारसंघातील सदस्यांचा कार्यकाळ डिसेंबर मध्ये संपणार आहे. इच्छुकांनी आतापासून इच्छुकांची निवडणूक तयारी सुरू केली आहे.



पुणे पदवीधर मतदारसंघामधून येता मुख्याध्यापक संघाची माजी अध्यक्ष तथा अध्यक्ष यांच्या नावाची ठळकपणे पहिल्यांदा चर्चा सुरू झाली आहे. दोन दिवसापूर्वी पंढरपूर इथे मुख्याध्यापक संघाच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षक मतदार संघाचे विद्यमान आमदार जयवंत आजगावकर यांनी सुभाष माने यांना पुणे पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढवावी असे जाहीर आवाहन केले. नंतर माने यांच्या संभाव्य उमेदवाराची राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली असून. निवडणुकीच्या संघाने मोर्चे बांधणी सुरू केली ती दिसून येत आहे.

हा मतदारसंघ पाच जिल्ह्याचा मतदारसंघ आहे. पुणे विभागातील महत्वाचा आणि मोठा मतदार संघ मानला जातो. मतदारसंघात पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, आणि सोलापूर या पाच जिल्ह्यांचा या मतदारसंघांमध्ये समावेश होत आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये पदवीधर मतदारांची संख्या मोठी असल्याने त्यामुळे सोलापूर जिल्ह्याची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

सुभाष माने यांनी पदवीधर मतदारसंघातील मतदारांशी संपर्क वाढवण्यास सुरुवात केल्याची चर्चा सुरू आहे. मुख्याध्यापकांनी शिक्षक संघटनेमध्ये असलेला त्यांचा संपर्क त्यांचा त्यांच्या संभाव्य उमेदवाराशी महत्त्वाचा करू शकतो.